## विटा येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात

## ता. खानापूर, जिल्हा– सांगली

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४६/२०२५.**

**सुप्रिया सागर देवकर ........... अर्जदार**

**विरुध्द**

**सागर अशोक देवकर वगैरे ........... जाबदार**

### निशाणी ०५ वरील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार यांनी महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा, कलम २३ अन्वये जाबदार कडून एकत्रीत दरमहा रक्कम रु.५०,०००/– अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**अर्जदारा यांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे –**

२. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे नागेवाडी येथे दि.१०.०२.२०२२ रोजी संपन्न झाला आहे. जाबदार क्र.२, ३ हे अर्जदाराचे सासू सासरे, जाबदार क्र.४ ही अर्जदाराची जाऊ, जाबदार क्र.५ हा अर्जदाराचा दिर आहे आणि जाबदार क्र.६, ७ या अर्जदाराच्या नणंदा आहेत. विवाह प्रसंगी अर्जदारच्या आईवडिलांनी अर्जदारला ४ तोळे वजनाचे सोन्याचे नेकलेस, दीड तोळा वजनाचे सोन्याचे कानातील झुमके, साडेसहा तोळे वजनाचा सोन्याच्या बांगड्या, एक तोळा वजनाचे सोन्याचे कानातील, अर्धा तोळा वजनाचे सोन्याचे कानातील दोन दागिने, एक तोळा वजनाचा सोन्याचा ३ अंगठ्या असे एकूण साडे चौदा वजनाचे सोन्याचे दागिने अर्जदारला घातले. तसेच अर्जदारच्या वडिलांनी जाबदार नं.१ यास पावणेतीन तोळे वजनाची सोन्याची साखळी/चैन, पाऊण तोळा वजनाची सोन्याची एक अंगठी, असे अर्जदार व जाबदार नं.१ चे मिळून एकूण १८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने विवाहात

घातले आहेत. विवाह झालेनतर जाबदार अर्जदारला घेवून त्यांच्या गावी गेले घरी गेल्यानंतर जाबदार नं २ ते ७ अर्जदारजवळ आले व त्यांनी 'तुझ्या आईवडिलांनी लग्नात अलमारी, कॉट गादी दिलेली नाही, आम्हाला भावकी काय म्हणेल' असे बोलून दाखवून अर्जदारच्या मनास वेदना दिल्या आणि रात्री अर्जदार यांना पुरेसे अंथरुण पांघरुन न देता चादर देवून फरशीवर झोपणेस सागितले व पातळ बेडसीट पांघरणेस दिले ,त्याचवेळी जाबदार नं २ यानी अर्जदारला तिच्या आईवडिलांनी लग्नात घातलेले अर्जदारच्या अंगावरील सर्व सोन्याचे दागिने काढून स्वतःजवळ घेतले. अपुरे अंथरुण–पांघरुन दिलेमुळे अर्जदारला थंडी सहन न झालेमुळे अर्जदार पहाटे सोफासेटवर झोपली याचा जाबदाराना राग येवून जाबदार नं.२ हिने अर्जदारला 'तू काय राजाची लेक आहेस का ? फरशीवर झोपायचे सोडून सोफ्यावर येवून झोपलीस व्हय ? थंडीने काय मरतीस काय?' असे शब्द वापरुन अर्जदारला शारिरीक, मानसिक वेदना दिल्या व तिचा अपमान केला.

३. अर्जदार व जाबदार नं.१ यांच्या लग्नाची पूजा झालेवर गावी देवीचे सवाशनीच्या कार्यक्रमाच्यावेळी जाबदार नं.२ यांनी दुपारी १२ वाजता भर उन्हात अर्जदारला पायात चप्पल न घालू देता गावातील सर्व देवाच्या दर्शनासाठी अनवाणी फिरविले उन्हाचा त्रास होवून अर्जदार यांच्या नाकातून रक्त येवू लागले. त्यावेळी जाबदार क्र.२ यांनी अर्जदारला 'थोडं चालल की तुझ्या नाकातून रक्त आलं एवढी नाजूक होतीस तर लग्नाला का तयार झालीस?' असे टोमणे मारुन अर्जदारच्या मनास वेदना दिल्या अर्जदारला उन्हाचा प्रचंड त्रास होवून व जाबदारांच्या बोलण्याचा धक्का बसून अर्जदार चक्कर येवून पडली. परंतु जाबदार नं.२ ही अर्जदारला तशीच उन्हात टाकुन कोणतीही विचारपूस न करता घरी निघून गेली. अर्जदारचे वडिलांनी लग्नात भांडी, अलमारी, कॉट गादी दिली नाही म्हणून यांचा सूड घेण्यासाठी अर्जदारला घरातील चांगली बादली अंघोळीसाठी न देता जनावराचे वापराची बाटली अर्जदारला अंघोळीसाठी देत होते. त्यातच अंघोळ करुन अर्जदारला तिचे कपडे धुवायला लावत होते. अर्जदार ही जाबदार नं. २ यांचे सोबत स्वयंपाक करत असताना जाबदार नं. २ या जाणुनबुजून अर्जदार यांचे हातावर गरम तेलाचे शिंतोडे उडवत होत्या. जाबदार नं.१ व त्यांच्या कुटुंबियांनी

अर्जदारला दिलेल्या त्रासामुळे व वेदनेमुळे अर्जदारास हाय ब्लडप्रेशरचा त्रास सुरु झाला त्यामुळे हाय ब्लडप्रेशर कंट्रोल करण्यासाठी गोळ्या सुरु कराव्या लागल्या.

४. एप्रिल २०२२ मध्ये जाबदार नं.१ हे अर्जदार हिला सिंगापूरला घेवून जात असताना जाबदार नं.१ हे अर्जदारच्या आई वडिलांना उर्मट बोलून त्यांची अवहेलना करत होते त्यामुळे अर्जदार यांना खूप वाईट वाटल्यामुळे अर्जदार बसमध्येच रडत असताना जाबदार नं.१ यांनी अर्जदार यांना हाताच्या कोपऱ्याने जोराचा ठोसा मारला. त्यानंतर मुंबई विमानतळावर पोहोचल्यानंतर जाबदार नं.१ यांनी अर्जदाराचा हात जोरात पिरगळला. सिंगापूरला गेल्यानंतर जाबदार नं.१ यांनी अर्जदार हिला ब्लडप्रेशर गोळ्या घेऊ दिल्या नाहीत व त्या बंद करावयाला लावल्या. जाबदार नं.१ यानी अर्जदारला पत्नी या नात्याने चांगली वागणूक, मानसन्मान, आपुलकी, प्रेम, जिव्हाळा दाखवला नाही.

५. दरम्यानच्या काळात अर्जदार ही गरोदर राहिली, त्यावेळी तपासणीचे दरम्यान डॉक्टरांनी हाय ब्लड प्रेशर कंट्रोल करण्यासाठीच्या गोळया चालू करणेसाठी सांगितले. जानेवारी २०२३ मध्ये जाबदार नं.१ हे अर्जदार यांना गावी सोडण्यासाठी सिंगापूरहून आले त्यावेळी प्रथम जाबदार नं.७ यांचे घरी मुंबई येथे गेले. जाबदार नं.७ यांनी अर्जदारला 'तुझी लायकी नसताना माझ्या भावाने तुला सिंगापुरला नेले, नाहीतर तू कुठल्यातरी खेडयात पडली असती' असे म्हणून वेदना दिल्या. जाबदार नं.१ यांनी अर्जदारला विटा येथे अर्जदार यांचे वडीलांचे घरी जानेवारी २०२३ मध्ये सोडले त्यानंतर अर्जदारची विचारपूस केली नाही. अर्जदारच्या आई वडिलांनी अर्जदारची डॉक्टराकडे जाऊन तपासणी केली असता ब्लड प्रेशर वाहत असल्याचे डॉक्टरांचे तपासणीत लक्षात आले. अर्जदारच्या जिवीताचा धोका टळावा म्हणून सांगली येथील डॉ.शित्रे यांचे हॉस्पिटलला दाखविले ,त्यावेळी डॉक्टरांनी ताबडतोब गर्भपात करणे जरुरीचे आहे असे सांगितले. अर्जदार यांनी जाबदारांशी सल्लामसलत केली. डॉक्टरांनी अर्जदारास दोन दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवून तिसऱ्या दिवशी गर्भपात केला. अर्जदार गर्भपातानंतर दवाखान्यात असताना जाबदार व त्यांचे कुटुंबीय अर्जदारची विचारपूस

करणेस देखील आले नाहीत.

६. जाबदार क्र. २, ३, ५ यांनी अर्जदार व त्यांचे आई वडिलांना उध्दट बोलून त्यांचा अपमान केला व अर्जदाराला 'तुला नांदविणार नाही, काय करायचे ते कर पण आमचे घरी तोंड दाखवू नकोस' असे म्हणाले व निघून गेले. जाबदार नं.१ ते ५ यांनी अर्जदारचा जेवढ़ा काळ ती सासरी नांदली त्या कालावधीत तिला टोमणे मारुन, अपमानास्पद बोलून, भरपूर काम लावून शारिरीक, मानसिक छळ केला तसेच अर्जदारच्या मनास वेदना दिल्या. जानेवारी २०२३ मध्ये जाबदार क्र.१ ने अर्जदारला तिच्या आई वडिलांच्या घरी आणून सोडलेपासून पती या नात्याने अर्जदारच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची, कपडेलत्याची, मानसिक स्थितीची कसलीही चौकशी केली नाही. जाबदार क्र. १ ने जबाबदार पती म्हणून त्याचे असणारे कर्तव्य पार पाडले नाही. अर्जदारची जाबदार नं.१ बरोबर संसार करणेची प्रामाणिक इच्छा असूनही जाबदार नं.१ च्या कुटुंबियांनी अर्जदारचा सांभाळ करणेस नकार दिलेला आहे.

७. अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदारला जाबदार नं १ ते ७ यानी दिलेल्या मानसिक, शारिरिक त्रासामुळे, मारहाणीमुळे व वेदनामुळे कोणताही कामधंदा होत नाही. अर्जदार ही स्वतः या चरितार्थ स्वत: करणेस असमर्थ आहे. जाबदार हा सिंगापूर येथे नोकरीस असून त्याला दरमहा र.रु.४,५०,०००/- ते ५,००,०००/- इतका पगार आहे शिवाय जाबदार व त्यांच्या कुटुबियांची वेजेगाव येथे ३५ एकर जिरायत बागायत शेती आहे. त्याच्या कुटुंबियांना शेतीतून रुपये २५ ते ३० लाख एवढे उत्पन्न मिळत. जाबदार व त्याच्या कुटुंबियांचा तीन पिढ्याचा सोने चांदी गलाई व व्यापाराचा व्यवसाय आहे. त्यामुळे अर्जदाराच्या उपजिवीकेसाठी, औषधोपचारासाठी, शिक्षणासाठी जाबदार क्र.१ व त्यांच्या कुटुंबियांकडून दरमहा ५०,०००/- पोटगी मिळावी आणि दरमहा १५,०००/- घरभाडे जाबदारांकडून मिळावेत. तसेच अर्जदाराच्या आईवडीलांनी घातलेले सर्व सोन्याचे दागिने अर्जदाराला जाबदारांकडून परत मिळावेत अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

८. जाबदार क्र.१, ४ ते ६ यांना नोटीस बजावणी होवून देखील अर्जाचे कामी हजर झाले नाहीत त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविणेत आला व जाबदार क्र.२, ३ व ७ यांनी अर्जास म्हणणे दाखल केले नाही म्हणून त्यांचे विरुध्द विना म्हणणे आदेश पारीत करणेत आला.

९. अर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार हीच्या कथनांवरुन खालील मुददे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या करणांकरीता मांडत आहे –

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही जाबदार क्र.१ कडून ५०,०००/– इतकी अंतरीम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| २. | अर्जदार हीस स्वतंत्र राहण्याची व्यवस्था अथवा घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

**– का र ण मि मां सा**

१०. कौटुंबिक हिंसाचार महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते त्या महिलेची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत मिळावी जेणेकरुन ती महिला कमीतकमी कायदेशीर लढाई करु शकेल या हेतुने केली आहे.

**मुद्दा क्र. १ बाबत –**

११. अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना सर्व प्रथम अर्जदाराला

कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते का हे पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, जाबदार क्र.१ हे अर्जदार हीस शिवीगाळ करुन मारहाण करायचे तसेच जाबदार क्र. २ ते ७ हे अर्जदार हीस लग्नाच्या मानपानावरुन, माहेरहून साहित्य घेवून आणण्याच्या कारणावरुन अपमानास्पद वागणूक देणे, शिवीगाळ करणे तसेच मारहाण करत होते त्याचबरोबर अर्जदार हीस पुढील शिक्षण घेण्यास विरोध केला ही बाब कथन केली आहे.

१२. अर्जदार हीने प्रस्तुत अर्जात संरक्षण अधिकारी यांचा कौटूंबीक घटना अहवाल दाखल केला आहे. सदर अहवालावरुन व अर्जदार यांच्या अर्जातील कथनांवरुन अर्जदारास शारिरीक, मानसिक, आर्थिक त्रासास सामोरे जावे लागले हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अर्जदारने जाबदार यांच्यावर केलेले आरोप पाहता ते आरोप निश्चितच गंभीर स्वरुपाचे आहेत. कोणतीही स्त्री गंभीर कारण नसताना तिच्या पतीपासून वेगळी राहते ही बाब संभाव्य वाटत नाही. प्रथमदर्शनी अर्जदार तिला होणा–या त्रासामुळे वेगळी राहत असल्याचे दिसुन येते. तसेच जाबदार यांनी त्यांना नोटीस बजावणी होवून देखील त्यांनी अर्जदाराच्या अर्जास म्हणणे दिले नाही. त्यामुळे अर्जदार हीचे अर्जातील कथने विनाआव्हानित राहिले आहेत. सबब अर्जदार हीचेवर कौटुंबिक हिंसाचार होत होता हे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१३. अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देताना अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. तसेच अर्जदाराकडे अर्थिक कमाईचे साधन नसेल तर जाबदार याची अर्जदाराला आर्थिक सहाय्य करण्याची परिस्थिती आहे किंवा नाही हे बघणे महत्वाचे ठरते.

१४. अर्जदार हीने तिच्या अर्जामध्ये ती सध्या कमावत असल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. जाबदार यांनी देखील त्यास म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदार ही कमावती नाही ही बाब प्रथम दर्शनी सिध्द होते.

१५. अर्जदार कमावती नसल्यामुळे तिचा उदरनिर्वाह करण्याची जाबदार क्र. १ याची जबाबदारी असल्याने जाबदार क्र.१ कमावता आहे का हे पहाणे गरजेचे ठरते.

अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, जाबदार क्र.१ हा सिंगापूर येथे नोकरीस असून त्यास दरमहा र.रु.४,५०,०००/- ते ५,००,०००/- इतका पगार मिळतो. जाबदार यांच्या कुटूंबीयांची मौजे वेजेगांव, ता.खानापूर येथे ३५ एकर शेती असून त्यातून त्यांना र.रु.२५ ते ३० लाख इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांचा सोन्या चांदीचा व्यवसाय असून त्यातून त्यांना वार्षिक दोन ते तीन कोटी एवढे उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार ही तिला दरमहा र.रु.५०,०००/- इतकी अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

१६. अर्जदार हीने तिच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. परंतू जाबदार क्र.१ यास कोणतेही अपंगत्व असल्याबात अर्जदार यांचे कथन नाही. अर्जदार यांचे वय पाहता तो निश्चीतच तो जाबदार याची जबाबदारी घेण्यास सक्षम असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.

१७. जाबदार याचेकडे उत्पन्नाचे साधन असलेने अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही जाबदार क्र.१ याचीच आहे. त्यामुळे अर्जदार जाबदार याचेकडून पोटगीची किती रक्कम मिळण्यास पात्र आहेत हे बघणे आवश्यक ठरते. अर्जदार हीने तिच्या कथनांमध्ये जाबदार क्र.१ हा सिंगापूर येथे नोकरीस असून त्यास दरमहा र.रु.४,५०,०००/- ते ५,००,०००/- इतका पगार मिळतो. जाबदार यांच्या कुटूंबीयांची मौजे वेजेगांव, ता.खानापूर येथे ३५ एकर शेती असून त्यातून त्यांना र.रु.२५ ते ३० लाख इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांचा सोन्या चांदीचा व्यवसाय असून त्यातून त्यांना वार्षिक दोन ते तीन कोटी एवढे उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. परंतू अर्जदार हीने त्याकरीता कोणताही पुरावा दाखल केला नाही.

१८. अर्जदार यांचेपासून वेगळे राहिल्यापासून जाबदार क्र.१ याने अर्जदारास कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, परंतु पत्नीस सांभाळण्याची नैतिक जबाबदारी ही जाबदार याची आहे. त्यामूळे उपरोक्त सर्वबाबी विचारात घेता अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरिता जाबदार याने अर्जदार यांना दरमहा र.रु.१०,०००/- देणे योग्य ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशत:

होकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. २ करीता –</u>**

१९. अर्जदार हीने अशी विनंती केली आहे की, जाबदार कडून तिला दरमहा घरभाड्याची रक्कम रु.१५,०००/– मिळावी. परंतू अर्जदार ही भाड्याने राहत असल्याबाबत अर्जात कोणतेही कथन नाही. याउलट ती तिच्या माहेरी राहते व तिला स्वतंत्र भाड्याने राहण्याची आवश्यकता आहे याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे अर्जदार कथन करत असलेली मागणी मान्य करता येणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>– आ दे श –</u>**

१. अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.

२. जाबदार क्र. १ याने अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.१०,०००/– ( रु.दहा हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन द्यावेत.

३. अर्जदार यांनी पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा.

४. अर्ज निकाली होण्यास अर्जदारामुळे विलंब होत असल्याचे दिसुन आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

६. आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार क्र. १ यांना मोफत देण्यात यावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.03.30 14:36:46 +0530

**(श्रीमती व्ही.डी.शिरसे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली

स्थळ – विटा
दि. ०७/०३/२०२६